# बियाणे सनियंत्रण कक्ष, संशोधन संचालनालय

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला -४४४ १०४

**डॉ. आम्रपाली अ. आखरे**
संशोधन उपसंचालक (बियाणे)

फोन (ऑ) ०७२४-२२५८३५३
इ-मेल - ddrseed@yahoo.com


जा.क्र.डीआर/टीजी/ कुशल अकुशल कामगार/११ /२०२५ दिनांक. ०८/ ०४ / २०२५

**दरपत्रक**

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**विषय– संशोधन उपसंचालक (बियाणे),बियाणे संनियत्रण कक्ष, या कार्यालयाला काम करण्याकरीता कंत्राटी पध्तीने बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ दोन करार तत्वावरील कुशल कामगार व अकुशल कामगार पुरविण्यासाठी दर (निविदा ) देण्याबाबत**

मा.महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संशोधन उपसंचालक संशोधन (बियाणे), डॉ. प.दे.कृ.वि,अकोला या कार्यालयामध्ये बियाणे बाबत विद्यापीठाशी खरीप रब्बी व उन्हाळी MOU करण्याकरीता शेतकरी बिजोत्पादक संस्था / विविध कंपनी /शेतकरी गट, व व्हिजीटर्स नेहमी भेट देत असतात. तसेच त्यांना पाणी देणे, खरीप व रब्बी,नियोजन सभेच्या कार्यक्रमास मदत करणे, कार्यालयाला उघडणे बंद करणे, साफसफाई करणे, झाडांना पाणी देणे, झाडणे, तसेच खरीप, रब्बी व उन्हाळी MOU तयार करण्यासाठी मदत करणे,टपाल पोहोचविणे इत्यादी तसेच कार्यालयमधील इतर कामे कुशल व अकुशल कामगारमार्फत कंत्राटी पध्तीने बाहयस्त्रोतामार्फत करण्याकरीताचे दर खाली दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन विहित मुदतीच्या आत (सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या मान्य असल्या बाबतचे प्रमाण पत्रासह)या कार्यालयास सादर करावेत.

| Sr.No | Description | Skilled contractual labour (Rs./day) | Un-Skilled contractual labour (Rs./day) |
|---|---|---|---|
| 1 | Basic wages | | |
| 2 | Variable dearness allowance | | |
| 3 | Total minimum wages | | |
| 4 | EPF 13% (As Per Employee's Provident Fund Rule, Employer Contribution) | | |
| 5 | ESIS 4% (As Per ESIC rule ) Employer Contribution | | |
| 6 | Service charges for company/firm charges | | |
| 7 | Total Rs. | | |
| 8 | GST @ 18% (If applicable) | | |
| 9 | Total with GST | | |
| 10 | Rate per month per unit | | |

वरील प्रपत्रात कुशल व अकुशल कामगाराचे दर ही किमान वेतन कायद्यानुसार सादर करावे या पेक्षा कमी दर ग्राहय धरण्यात येणार नाही. सदर दरपत्रके दिनांक: १७/०४/२०२५ पर्यन्त कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत.

## दरपत्रकाविषयी नियम, अटी व शर्ती

१. कंत्राटी कामगार पुरविण्याच्या अद्यावत परवान्याची सत्यप्रत.

२. संस्था/कंपनी कंत्राटदाराच्या आस्थापनेचे पॅन कार्ड व दरपत्रकावर स्वाक्षरी करणाऱ्याचे आधार कार्डची छायांकित प्रत.

३. कमीत कमी एक वर्षाचा विद्यापीठात अथवा शासकीय संस्था/निमशासकीय कार्यालय यांना कंत्राटी मजूर/ कामगार पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत तसेच संबंधित कार्यालयात काम समाधानकारक पूर्ण केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत. कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख/संबंधित व्यक्तीचे पूर्ण नाव व संपर्क क्रमांक.

४. कोणत्याही शासकीय, निमशासकीय/महामंडळाच्य काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र सादर करावे.

५. भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

६. व्यावसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

७. ई. एस. आय. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

८. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

९. दरपत्रक समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

१०. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचे मासिक दर नमूद करताना Basic Wages + Variable Dearness Allowance यांच्या एकूण रकमेवर त्याला आकारवयाच्या त्याच्या कमिशन गणना करणे अपेक्षित आहे. सारखे दर आल्यास संबंधितांना वाटाघाटी करिता बोलावून त्याचा अनुभव व वार्षिक उलाढाल इत्यादी बाबी विचारात घेऊन अंतिम निर्णय समितीचा असेल.

११. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचे वेतन रोखीने अदा नकरता Account Payee Cross Cheque द्वारे अदा करणे किंवा बँकेत खाते उघडून त्याचे मासिक वेतन त्याच्या बँक खात्यात पाच तारखेच्या आत जमाकरणे बंधनकारक राहील.

१२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदी पेक्षा कमी रक्कम नमूद करू नये. थोडक्यात कृषी विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन संबंधित कामगारास देणे बंधनकारक राहील.

१३. ज्या कंत्राटी कामगारचा/ भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यान्वित नसेल त्यांना कामावर ठेवू नये तसेच नवीन कामगार कामावर घ्यायचे असल्यास त्यांचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक कार्यान्वित करून घेणे बंधनकारक राहील.

१४. बालमजूर कायद्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५. पी.एफ.,विमा योजना, बोनस, ग्रॅज्युटी, कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार इत्यादी देयक वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबतीत काही वाद निर्माण झाल्यास विभागप्रमुख/ विद्यापीठ प्रशासन हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी कार्यालयाची/ विद्यापीठाची राहणार नाही.

१६. कंत्राटदाराने कामगारास दरमहा अदा केलेल्या भविष्य निर्वाह निधी, गट विमा पावती व वेतन चिठ्ठी दरमहा संबंधित कार्यालयास देणे बंधनकारक राहील तसे न केल्यास त्याचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१७. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदाहरणार्थ हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंदवह्या ठेवणे व ते संबंधित अधिकाऱ्याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१८. महाविद्यालयीन/ कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवशीही चालत असल्याने वेळोवेळी कंत्राटी कामगारांना सुट्टी देणे, कमी जास्त प्रमाणात कंत्राटी कामगार पुरवठा करणे व प्रत्येक कंत्राटी कामगाराला साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील.

१९. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. या संबंधीची कुठलीही जबाबदारी महाविद्यालय कार्यालयाची राहणार नाही.

२०. प्रत्येक कंत्राटी कामगारांना कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२१. कंत्राटी कामगारास काम करते वेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदाहरणार्थ वीज, पाऊस, भूकंप, मशिनरी अपघात, प्राणी/ साप आणि वादळामुळे इजा अपघात मृत्यू संभवल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्रादाराची राहील. याचा महाविद्यालय/ कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२२. कंत्राटी पद्धतीने कामगार पुरवठा करण्याचे काम सब कॉन्ट्रॅक्टर/ कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्रादाराचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अमानत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर महाविद्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या दरपत्रक प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही. उपरोक्त कारणामुळे काहीकायदेशीर बाबी उत्पन्न झाल्यास त्याचा विद्यापीठाशी काहीही संबंध राहणार नसून त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

२३. कंत्राटी कामगाराने काम समाधानकारक रित्या न केल्यास त्याला त्यादिवशी परत पाठवण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी कामगाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

२४. कामात कचुराई व हलगर्जीपणामुळे महाविद्यालय कार्यालयाचे नुकसान झाल्यास दंडासह भरपाई करावी लागेल.

२५. कोणतीही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रक नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवला आहे. आवश्यकतेनुसार एकावेळी एक महिना असे जास्तीत जास्त तीन वेळा सहमतीने कंत्राटाचा कालावधी वाढवता येईल.

२६. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय, कर संबंधित दरपत्रक धारकाने भरणे बंधनकारक राहील. दरपत्रकामधील दर कर समाविष्ट करून घ्यावेत.

२७. करार संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यासंदर्भात अंतिम निर्णय विद्यापीठाचा राहील.

२८. उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे ठेकेदार दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

२९. कंत्राटदाराने नियम व अटी काळजीपूर्वक वाचून या अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र दरपत्रक सादरकर्त्यास सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

३०. सदर दरपत्रक प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय हे राहील.

संशोधन उपसंचालक/ संशोधन (बियाणे),
डॉ.प.दे.कृ.वि,अकोला

प्रतिलीपी सादर--

१. मा. संशोधन संचालक डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला यांना माहितीसाठी

२.मा.प्रभारी अधिकारी,कृषि संशोधन माहिती प्रणाली (ARIS) कक्ष. डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्दी करीता सादर